**महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळा मार्फत घेण्यात येणा-या परीक्षांच्या उत्तरपत्रिकाची फोटो प्रत व उत्तरपत्रिका पुर्नतपासणी करुन प्रशिक्षणार्थ्यांना मिळणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्रमांकः व्हीओसी-२००९/(२२१/०९)/व्यशि-४,
मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२
दिनाक : १ सप्टेंबर, २०१०

संदर्भ : प्र.संचालक, व्यवसाय शिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई, यांचे
१) क्र.७/शांतावि/२००९/९१ दि.२५.९.२००९ व
२) क्र.७/मराव्यशिपमं/२०१०/५६ दि.२७.८.२०१० चे पत्र.

**प्रस्तावना :** राज्यात महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई यांच्या मार्फत विविध गटातील ३६० प्रमाणपत्र अभ्यासक्रम विविध शासकीय व अशासकीय संस्थामधून राबविले जातात. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या ३ वेळा (जानेवारी/एप्रिल/जुलै) अंतिम परीक्षा घेतल्या जातात. परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेची फोटो प्रत व उत्तरपत्रिका पुर्नतपासणी करुन मिळण्याची सोय सद्य:स्थितीत उपलब्ध नाही. या परीक्षेस बसलेल्या परीक्षार्थींना उत्तरपत्रिकेची फोटो प्रत व उत्तरपत्रिका पुर्नतपासणी करुन मिळाल्यास परीक्षा पध्दतीमध्ये पारदर्शकता व विश्वासार्हता निर्माण होऊ शकते. त्यामुळे महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळामार्फत घेण्यात येणा-या परीक्षेच्या उत्तरपत्रिकाच्या फोटोप्रतीची व उत्तरपत्रिका पुर्नतपासणी करुन प्रशिक्षणार्थ्यांने मागितल्यास तसे शुल्क आकारुन उत्तरपत्रिकांची फोटोप्रत व उत्तरपत्रिका पुर्नतपासणी करुन प्रशिक्षणार्थ्यांना देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -** महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळामार्फत घेण्यात येणा-या परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या फोटोप्रतीची व उत्तरपत्रिका पुर्नतपासणी करुन परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांने मागितल्यास त्यास पुढील प्रमाणे शुल्क आकारुन उत्तरपत्रिकांची फोटोप्रत व उत्तरपत्रिका पुर्नतपासणी करुन देण्यास पुढील कार्यपध्दतीस अनुसरुन शासन मान्यता देण्यात येत आहे.

**शुल्क**

| | | |
|---|---|---|
| १) उत्तरपत्रिका फोटो प्रत | : | रु.२०/- अर्ज मुल्य |
| | : | रु.५००/- प्रती विषय (दोन लेखी विषयांसाठी फक्त) |
| २) उत्तरपत्रिका पुर्नतपासणी | : | रु.२०/- अर्ज मुल्य |
| | : | रु.५००/- प्रती विषय (दोन लेखी विषयांसाठी फक्त) |

# कार्यपध्दती

## (अ) उत्तर पत्रिका फोटो प्रत

१) परीक्षार्थ्यांनी ज्या संस्थेतून प्रशिक्षण घेतलेले आहे त्या संस्थेकडे उत्तरपत्रिका फोटो प्रत मिळण्यासाठी परीक्षा निकाल लागल्यानंतर १० दिवसांचे आत अर्ज करणे आवश्यक आहे.
२) संस्थेकडे जमा झालेले अर्ज जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडे परीक्षा निकाल लागल्यापासून १२ दिवसांचे आत जमा करावेत.
३) संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी प्राप्त झालेले अर्ज मध्यवर्ती तपासणी केंद्राकडे परीक्षा निकाल लागल्यापासून १५ दिवसांचे आत पाठवावेत.
४) मध्यवर्ती तपासणी केंद्राने त्यांचे स्तरावर (१) प्राचार्य / मुख्याध्यापक (२) पूर्णवेळ शिक्षक (३) संबंधित विषय तज्ञ अशी समिती गठीत करुन प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी करुन उत्तरपत्रिका फोटो प्रत संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना निकाल लागल्यापासून २० दिवसांचे आत पाठवावेत.
५) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी संबंधित परीक्षार्थीस संस्थेमार्फत निकाल लागल्यापासून २० दिवसांचे आत उत्तरपत्रिका फोटो प्रत पाठवावी.
६) उत्तरपत्रिकेची फोटो प्रत संबंधित परीक्षार्थीस केवळ वैयक्तिक माहितीसाठी देण्यात येणार आहे. त्यास इतर कोणासोबत हस्तांतरीत करणे अथवा इतर कोणत्याही उद्देशासाठी वापर करणे प्रतिबंधीत आहे. जर परीक्षार्थी सदर उत्तरपत्रिकेच्या फोटो प्रतीचा गैरवापर करीत असल्याचे आढळल्यास संबंधित परीक्षार्थीचा परीक्षेचा निकाल रद्द करण्यात येऊन प्रतिबंध (डिबारमेंट) बाबतची कार्यवाही करण्यात येईल.

## (ब) उत्तरपत्रिकेची पुर्नतपासणी

१) प्रशिक्षणार्थ्यांना ज्या संस्थेतून प्रशिक्षण घेतले आहे, त्या संस्थेकडे परीक्षा निकाल लागल्यापासून २० दिवसांचे आत अर्ज करणे आवश्यक आहे.
२) संबंधित संस्थेमध्ये प्राप्त झालेले अर्ज जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडे परीक्षा निकाल लागल्यानंतर २० दिवसांचे आत पाठवावेत.
३) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेले एकूण अर्ज निकाल लागल्यापासून २५ दिवसांचे आत मंडळाकडे पाठवावेत, त्याची प्रत संबंधित मध्यवर्ती तपासणी केंद्रास पाठवावी.
४) संबंधित मध्यवर्ती तपासणी केंद्राने निकाल लागल्यापासून एक महिन्याचे आत संबंधित परीक्षार्थ्यांची मूळ उत्तरपत्रिका मंडळाकडे पाठवावी.
५) मंडळ स्तरावर संबंधित विषयातील तज्ञांची नेमणूक करुन उत्तरपत्रिकेची पुर्नतपासणी परीक्षा निकाल लागल्यापासून दिड महिन्याचे आत करावी.
६) संबंधित विषयातील तज्ञांकडून उत्तरपत्रिकेची पुर्नतपासणी झाल्यानंतर अंतिम निर्णय घेण्यासाठी मंडळ स्तरावरील समितीसमोर (१) अध्यक्ष (२) सचिव (३) परीक्षा नियंत्रक (४) उपसचिव (५) सहाय्यक सचिव यांचेकडे सादर करावी.
७) पुनर्तपासणी केल्यानंतर आवश्यक ते बदल असल्यास संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना मंडळाकडून दिड महिन्याचे आत कळविणे आवश्यक आहे.
८) तर उत्तरपत्रिकेत पुर्नतपासणी अगोदर मिळालेले मार्क व पुर्नतपासणी केल्यानंतर मिळालेले मार्क यात जास्तीत जास्त मार्काच्या १०% एवढा किंवा त्यापेक्षा जास्त (अंतिमत: वाढ किंवा कमी झालेल्या मार्काचा विचार न करता) फरक असल्यास संबंधित निकालपत्रकात बदल करावा.

९) जर पुर्नतपासणी केल्यानंतर उत्तरपत्रिकेवरील मार्कामध्ये बदल होऊनसुध्दा परीक्षार्थी उत्तीर्ण होत नसल्यास निकालपत्रकात कोणत्याही प्रकारचा बदल केला जाणार नाही.

१०) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी संबंधित संस्थेमार्फत परीक्षार्थ्यांस अंतिम निकाल कळवावा.

११) सुधारीत मार्कामुळे पुढील प्रशिक्षणाची अथवा नोकरीची संधी उपलब्ध राहत नसल्यास परीक्षार्थीला त्यासाठी कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही. सदर बाबत मंडळ कोणत्याहीप्रकारे जबाबदार राहणार नाही.

१२) मूळ गुणपत्रिका मंडळाकडे जमा केल्यानंतरच सुधारीत गुणपत्रिका संबंधित परीक्षार्थीला देण्यांत येईल.

उपरोक्त कार्यपध्दतीनुसार परीक्षार्थ्यांस उत्तरपत्रिकेची फोटो प्रत व उत्तरपत्रिका तपासणी करुन मिळण्याबाबतची कार्यवाही ही सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून अंमलात येईल. त्याच प्रमाणे महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई यांनी परीक्षेस बसलेल्या परीक्षार्थ्यांना उत्तर पत्रिकेची फोटो प्रत व उत्तर पत्रिका पुर्नतपासणी करुन देण्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क परीक्षा मंडळाच्या सचिवांच्या नावे असलेल्या स्वीय प्रपंची लेख्यात जमा करावे व या शुल्काचा विनियोग परीक्षेसंबंधीच्याच कामासाठी शासन निर्णय क्रमांक :संकीर्ण-१००२/(६१०/२००२)/आस्था-१, दिनांक ११ जून, २००३ मधील तरतूदीनुसारच करण्यात यावा.

हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणकीय सांकेतांक क्रमांक २०१००९०३१४००१२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(शोभा वि. पत्की)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत : ,

१) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१
२) प्रभारी संचालक (व्यवसाय शिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई -१
३) महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, बांद्रा (पू), मुंबई - ५१
४) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/ औरंगाबाद (व्यवसाय शिक्षण संचालनालयामार्फत)
५) सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, (व्यवसाय शिक्षण संचालनालयामार्फत)
६) मा.मंत्री (उ.व तं.शि.), यांचे खाजगी सचिव.
७) मा.राज्यमंत्री (उ.व तं.शि.), यांचे खाजगी सचिव.
८) सर्व व्यशि कार्यासने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय
९) निवड नस्ती (व्यशि-४)

D:\Patki\G.R\Board.doc